क्र.का.१२/मू/मुद्रांक परतावा/
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे १.
दिनांक : /७/१९९५

प्रति,

सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व
सह जिल्हा निबंधक.

**विषय :- मुद्रांक परतावा प्रकरणी प्रतिज्ञापत्राबाबत.**

**प रि प त्र क :-**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ४७ अन्वये वापरण्यास अयोग्य असलेल्या मुद्रांकाबाबत परतावा देण्यासाठी केलेल्या अर्जासोबत द्यावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का.१२/मू/परतावा/१९९६-२०२५/दि. २९/८/९४ सोबत देण्यात आला होता व प्रकरणानुरूप योग्य तरतुदीचा उल्लेख करून त्या कारणापुरतेच प्रतिज्ञापत्र अर्जदाराकडून घेऊन प्रकरणासोबत पाठविण्याच्या सूचना देण्कयात आल्या होत्या.

तथापि असे निदर्शनास आले आहे की, मुद्रांक जिल्हाधिकारी परतावा प्रकरणासोबत जसेच्या तसे नमुना प्रतिज्ञापत्र पाठवितात. ते योग्य नाही. त्यामुळे परताव्याचे निश्चित कारण समजू शकत नाही.

तरी अर्जदाराने कोणत्या कारणासाठी मुद्राकांचा परतावा मागितला आहे. त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदाराकडून घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे अर्जदारास मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच परताव्याचे कारण व परतावा कोणत्या नियमाच्या तरतुदीखाली देय आहे याचा उल्लेख शिफारस पत्रात करण्यात यावा.

प्रस्ताव मंजूरीसाठी पाठवितांना मुद्रांक ज्यांचे नांवे खरेदी करण्यात आले आहेत, त्यांनीच परतावा अर्ज केला आहे किंवा नाही, नसल्यास त्याबद्‌दल मुखत्यारपत्र दिले आहे काय याचीही खात्री करणे आवश्यक आहे. तसेच प्रकरण पाठविण्यापूर्वी काळजीपूर्वक छाननी करण्यात यावी व

त्यासाठी करावा लागणारा अनावश्यक पत्रव्यवहार टाळावा. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात जुनी प्रकरणे वर्षानुवर्षे तशीच पडू देतात, त्यावर कार्यवाही न करता नव्याने प्राप्त झालेली प्रकरणे मंजूरीसाठी पाठवितात. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. तरी त्यांनी जुनी प्रकरणे प्राधान्याने पाठवावीत. प्रकरणाची पूर्ण पुर्तता झाल्यावर प्रकरण त्वरीत पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**उप नोंदणी महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**